# बृहन्मुंबई महानगरपालिका

घन कचरा व्यवस्थापन

क्र.सहा.अभि./ घकव्य /7317/ एम/प दि.09.07.2024

विषय :- एम/प विभागातील रस्ते स्वच्छता योजना, मोटर लोडर तसेच मॅनिंग व मॉपिंग योजने अंतर्गत स्वच्छतेकरिता स्वयंसेवक / कामगार पुरविण्याकरिता संस्थांकडून अर्ज मागविण्याबाबत.

# स्वारस्य अभिव्यक्ती

## जाहिरात

'एम/प' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरिता विविध योजना राबविण्यासाठी 'एम/प' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छूक स्थानिक नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था, औदयो. उत्पा सहकारी संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा.) या सर्व संस्थांची सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | कामासाठीनिवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| 1 | रस्ते स्वच्छता योजना | 2 | 3300 + 18% GST = रु.3894/- |
| 2 | मोटर लोडर योजना | 15 | 3300 + 18%GST = रु.3894/- |
| 3 | मॅनिंग व मॉपिंग | 4 | 6600 + 18% GST = रु.7788/- |

अर्जाची प्रत 'एम/प' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घकव्य) रु.3300 + 18% GST = (एकूण रु.3894/-) रस्ते स्वच्छता योजना व रु.3300 + 18% GST = (एकूण रु.3894/-) मोटर लोडर तसेच रु.6600 + 18% GST = (एकूण रु.7788/-) मॅनिंग व मॉपिंग करिता रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (Municipal Corporation of Greater Mumbai) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C) येथे जमा केल्यानंतर दिनांक 11.07.2024 ते दिनांक 16.07.2024 रोजी कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. अर्ज सादर करताना सर्व कामासाठी कागदपत्रांची पूर्तता करुनच अर्ज सादर करावेत. अन्यथा पात्रता यादीमध्ये आपली संस्था पात्र होणार नाही. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक एम/प विभाग कार्यालय संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'एम/प' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने ' एम/प ' विभाग कार्यालयात अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख दिनांक 16.07.2024 सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक अभियंता(घकव्य)एम/प